# पिरॅमिड

- **प्रज्ञा आपटे** (शार्लट, नॉर्थ कॅरोलिना)



अर्णव एक तर्कनिष्ठ (Logical) , analytical, बुद्धीमान मुलगा. उत्तरं शोधायची म्हटली की गोष्टीच्या मुळाशी जाणारा. मूळ पदवी Masters in Analytical Chemistry. त्याच्या मित्राचे, विवेकचे, काका पुरातत्व खात्यात कामाला. काकांबरोबर तो नेहमी गप्पा मारायचा. काका त्यांना मिळालेली Samples , पृथक्करण करण्यासाठी प्रयोगशाळेत पाठवतात म्हणून त्यांच्याबरोबर तो सुद्धा प्रयोगशाळेत जायचा. आपल्या शिक्षणाचा असा रोजच्या व्यवहारातला उपयोग (direct application) पाहून त्याला खूप सुखावह वाटायचं. एकदोनदा काकांनी , त्यांना आलेले काही अनुभव अर्णव आणि विवेक याला सांगितले होते. काकांचे इजिप्तमधल्या कामाचे अनुभव अर्णवला एखाद्या सुरस चमत्कारिक कथेप्रमाणे वाटले. पिरॅमिडस् !! तेव्हापासून अर्णवने पिरॅमिड्स या विषयाचा अभ्यास सुरू केला. Analytical Chemistry सारख्या विषयात पदव्योत्तर शिक्षण असताना, काहीही अनुभव गाठीशी नसून सुद्धा पुरातत्वखात्याची नोकरी करण्यात घरच्या सगळ्यांचा विरोध होता.

" अरे एखाद्या pharmaceutical company मधे चांगली analyst नोकरी मिळवायची सोडून हे रे काय तुझं? " ...... आई

" तुला Ph.D. करायची आहे कां? तू लगेचच नोकरी केली पाहिजेस असं माझं म्हणणं नाही " ...... बाबा

" अर्णावा .... बाळा काय रे हे ? गाडलेली भूतं उकरून काढू नयेत अशी !! काय समोर उभं ठाकेल , सांगता येत नाही हो ... " ...... आजी

सगळ्यांची काही ना काही स्वरूपात काळजी करणं चालूच होतं . पण हेच कोणाला कळत नव्हतं की त्या गाडलेल्या भुतांचं , त्या गूढाचंच आकर्षण वाटत होत अर्णवला !! स्वतःबद्दल विश्वास वाटत होता. म्हणूनच त्याने आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करायचं ठरवलं. काकांच्यामुळे अशी संधी लवकरच चालून आली.

इजिप्त ... पहाटेचे २.०० ..... काका, अर्णव आणि त्यांचे सहकारी अजूनही पिरॅमिडच्या तळघरातच होते. त्यांचे स्थानिक सहकारी जरासे नाराज होते . तो पिरॅमिड , शापित पिरॅमिड म्हणून ओळखला जात होता. त्यामुळे असं मध्यरात्री काम करायला ते जरा नाराज होते. त्या पिरॅमिडचं बांधकाम अर्धवट होतं की पडझड झाली होती हे अर्णवला नक्की सांगता येत नव्हतं. दर दोन तासांनी प्रत्येक जण थोडावेळ बाहेर जाऊन मोकळी हवा खात होता. अर्णवही निघाला.

"अरे? इतका वेळ लागला होता कां मला आत यायला ? की मी दुसऱ्याच वाटेने बाहेर आलोय ?" अर्णवच्या मनात विचार आला.

तेवढ्यात त्याला एक सावली दिसली.

" Abayomi ... Abayomi " अर्णवने त्याच्या सहकाऱ्याला हाक मारली.

तो त्या सावलीच्या मागे जात, त्या तळघराच्या अरुंद भुयारी वाटेतून एकदाचा बाहेर पडला. आकाशात स्वच्छ चांदणं पसरलं होतं. अर्णवने मोकळ्या हवेत छातीभरून श्वास घेतला. मंद वाऱ्याच्या झुळकी बरोबर अत्तराचा वास अर्णवच्या नाकात शिरला. त्या दिशेने त्याने झटकन वळून पाहिलं. एक इजिप्शिअन युवती उभी होती.

भूत !! आजकाल असे कपडे कोण घालतं? बाप रे !! मी चक्क भूत पाहतो आहे ? ...... अर्णवच्या मनात विचार आला. बोलेल कां ती माझ्याशी ? कोणत्या भाषेत बोलू मी तिच्याशी ? अनेक प्रश्न अर्णवच्या मनात दाटून आले. तो जवळ येतोय म्हटल्यावर ती तरुणी अर्णवशी बोलू लागली.

इजिप्शिअन तरुणी म्हणाली .... "अरे यौ हरे अलोने? (are you here alone ?) वहात अरे यौ हरे फो ? (what are you here for?)

अर्णव गप्प होता. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव वाचल्यागत तिने विचारलं....

" कॉन्फुसेद ? (confused?) लुक्स तो मे थाट , यौ अरे हरे विथ , थोये पेओप्ले व्हो , अरे दिग्गिंग मी, फाठेर'स ग्रावे. ( looks like you are here with the people who are digging my father's grave ) दो यौ वंत क्नोव हिद्देन सेक्रेत्स फोरम थे पास्त ? (Do you want to know hidden secrets from the past?) "

अर्णवच्या मनात विचार आला... काय सांगते आहे मला ही ?... छे ! काका हवे होते आत्ता.

इजिप्शिअन तरुणी म्हणाली... " यौ हवे तो कामे मे . ( you have to come with me ) "

तिने त्याचा हात धरला आणि ती एका दिशेने जाऊ लागली. अर्णव गडबडला. काय करावं ते त्याला सुचेना. तिच्या हाताच्या थंडगार स्पर्शाने तर त्याची खात्री झाली की ती एक आत्मा आहे. ती त्याला एका तळघरात घेऊन गेली. त्यांना सापडलेल्या दिव्यांच्या सारखेच दिवे तिथे तेवत होते. त्याला त्याच्या सहकाऱ्यांचे अंधुकसे आवाज येत होते. तिने त्याला भिंतीवरची चित्र दाखवायला सुरवात केली. अर्णव त्याच्या कुवतीनुसार त्या चित्रांचा अर्थ लावत होतं. आपण बुध्दिमान आहोत याचा त्याला आता पर्यंत असलेला अभिमान काहीसा सैल होत होता. सगळी चित्र काहीतरी कथा सांगत होती. तो त्या चित्रांचा बारकाईने अभ्यास करायला लागला.

काय आहे हे ? युद्ध ? नंतर ही मिरवणूक आहे कां ? काहीतरी साजरं केलं जातंय कां ? छे !! आपल्याला काहीच अनुभव नाही. आत्ता काका हवे होते याचा अर्थ लावायला. तो गरकन वळला .........

कुठे आहे ती मुलगी ? त्याच्या मागे संपूर्ण अंधार होता... शोधाशोध..... एकच दिवा चालू होता आणि तो त्याच्याच हातात होता. बाकीचे दिवे ? होते.... पण त्याच्या काचा थंड होत्या . मगाशी चालू होते ना हे दिवे ? मग काचा थंड कशा ?.... ती मुलगी ?...

अर्णव गडबडला. हातातला कंदील घेऊन वाट शोधायला लागला. वाट सापडेना. त्याचा आत्मविश्वास डळमळीत व्हायला लागला. काकांचा आवाज आला. अस्पष्ट असा..... अर्णव..... अरे अर्णव....

ते त्याला शोधात असावेत. अर्णवने काकांना खूप हाका मारल्या. थकून मटकन जमिनीवर बसला... आणि .... आणि हास्याची एकच लाट फुटली. भराभर torches आणि दिवे लागले. अर्णवचे सहकारी खो खो हसत होते आणि ती इजिप्शिअन युवती त्यांच्यामध्येच होती. काका हसत हसत पुढे आले.

"We played a little joke on you young man! Welcome to the team! अर्णव एक लक्षात ठेव. पुरातत्वशास्त्र हे एक शास्त्र आहे. त्यासाठी फक्त बुध्दिमत्ता नाही, तर अभ्यासही आवश्यक आहे. आणि अनुभवाबद्दल म्हणशील तर.... तो तर कणाकणाने वेच, साठव आणि वाढव. "

***